# नगर परिषद, अंबड

## जि.जालना

# बांधकामाचा परवाना

जा.क्र./न.प.अं./बां.प./कार्या13/81/2016
कार्यालय नगर परिषद,अंबड
दिनांक 30/3/2016

परवाना धारण करणाऱ्याचे नांव — रमेश नन्दलाल सोडानी

सि.टी.सर्व्हे नंबर ( — ) प्लॉट नं. (18-113-1ते6) सर्व्हे नं. ( 01 भाग )

महाराष्ट्र नगर पालिका अधिनियिम १९६५ च्या कलम १८९ व महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम अन्वये व तत्संबंधित नियमास अनुसरुन खालील प्रमाणे बांधकामाची/दुरुस्तीची परवानगी दिली जाते. सदरील परवाण्याचा अंमल आज तारखे पासुन एक वर्षापर्यंत राहिल. तसेच कलम १९३ (१) प्रमाणे बांधकाम पूर्ण झाल्याबाबत लेखी माहिती तपासनीसाठी या कार्यालयात पाठविण्यात यावी. नगर रचनाकार यांनी ------------ या प्रकरणी काही सुधारकाना, सुचना व दुरुस्ती कळविल्यास त्याप्रमाणे पुर्तता व अंमलबजावणी करणे आपल्यावर बंधनकारक राहील.

| | |
|---|---|
| १) बांधकाम सुरु करणेपूर्वी संबंधित खात्याकडुन बीन शेतीचा दाखला घेण्यात यावा. | ✓ |
| २) शेजाऱ्याच्या कोणत्याही प्रकारच्या हक्कास बाधा निर्माण होईल असे बांधकाम करण्यात येऊ नये. | ✓ |
| ३) मंजुर बांधकाम नकाशाच्या विरुध्द जर बांधकाम करण्यात आले तर आपणाविरुध्द म.न.पा.अधि.१९६५ चे कलम १८९ (८) खाली व महाराष्ट्र प्रादेशिक अधिनियम १९६६ कलम ५३ अन्वये कडक कारवाई करण्यात येईल. | ✓ |
| ४) महाराष्ट्र नगर पालिका अधिनियम १९६५ च्या कलम १९३ (१) अन्वये बांधकाम पुर्ण झाल्या नंतर बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र घेण्यात यावे व त्यानंतर इमारतीचा वापर सुरु करावा. नसता आपल्या विरुध्द कडक कारवाई करण्यात येईल. | ✓ |
| ५) बांधकाम सुरु करनेपुर्वी सिटी सर्व्हे कार्यालयातुन भुखंडाचे नामांतर हद्दी व क्षेत्रफळाची दुरुस्ती करुन घ्यावी. | ✓ |
| ६) बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र घेण्यापुर्वी सिटी सर्व्हे नंबर ------- चे पोटविभागणीची परवानगी घेण्यात यावी. | ✓ |
| ७) बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र घेण्यापुर्वी विकास खर्चाची (बेटरमेट चार्जेस) राहिलेली रक्कम थकबाकी पुर्णपणे भरण्यात यावी. | ✓ |
| ८) या कार्यालयाचे संबंधीत अधिकारी जागेवर प्रत्यक्ष पाहनीसाठी आले असता त्यांचे अवलोकनार्थ मंजुरीचे संबंधित कागदपत्रे दाखविण्यात यावेत. | ✓ |
| ९) इमारतीच्या रुपरेषेची (Lineout) जागेवर आखणी करुन सदरील आखणी बरोबर असल्याचे प्रमाणपत्र घेतल्या नंतर पुढील बांधकाम सुरु करावे. | ✓ |
| १०) जोत्या पर्यन्तचे बांधकाम बरोबर असल्याचे प्रमाणपत्र कार्यालयाकडुन घेतल्यानंतर बांधकाम सुरु करावे. | ✓ |

Scanned by CamScanner

११) छत लेव्हल पर्यंतचे बांधकाम बरोबर असल्याचे या कार्यालयाचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर पुढील बांधकाम सुरु करावे. ✓

१२) महाराष्ट्र नगर पालिका अधिनियम १९६५ चे कलम १८९ (८) आणि महाराष्ट्र प्रादेशिक तथा नगर रचना अधिनियम १९६६ चे अंतर्गत इमारत बांधकामाबाबत तयार करण्यांत आलेल्या कोणत्याही कलमाचे अथवा नियमाचे उल्लंघन केल्यास, आपणाविरुध्द कायदेशिर कारवाई करण्यांत येईल. याची नोंद घ्यावी. प्रत्यक्षात काम सुरु करण्यांपुर्वी ले-आऊटअंतीम मंजुरी घेणे बंधनकारक राहील. ✓

१३) या परवानगी पत्रा अधारे जी जागा सिटी सर्व्हे रेकॉर्डनुसार आपल्या मालकीची नाही त्या जागेवर कोणत्याही प्रकारचा विचार करण्याचा हक्क आपणास पोहचणार नाही. ✓

१४) सेप्टीकचे शोचकुप असावे व या परवानगी पत्रका सोबत जोडलेल्या मंजुर नकाशानुसार व त्यात दर्शविलेल्या दुरुस्तीनुसार बांधकाम असावे. ✓

१५) अकृषीक परवाना शुल्क संबंधित महसुल अधिका-याकडे दरवर्षी भरण्याची जबाबदारी आपणाकडे राहील तो नियमीत भरण्यात यावा. ✓

१६) मंजुर भुमी अभिन्याचे अधिन राहून व दिलेली समासांतरे सोडून बांधकाम करावे. ✓

१७) सदरहू भुखंडा मधुन कोणत्याही प्रकारच्या विद्युत पुरवठ्याच्या लाईन जात असल्यास प्रथमत: त्या काढण्यात याव्यात तद्नंतर बांधकाम करणे, नसता संभाव्या जिवीत व वित्तीय होणा-या हाणीची सर्वस्वी जबाबदारी अर्जदारावर राहील. ✓

१८) जलपुनर्भरण व्यवस्था करणे बंधनकारक राहील. ✓

१९) सदर बांधकाम परवानगी नगर रचनाकार यांच्या प्राथमीक मंजुरी नुसार व नगर पालिकेच्या अंतीम मंजुरीस अधिन राहून देण्यांत येत आहे. ✓

२०) सदर बांधकाम परवानगी बाबत कुठल्याही कायदेशीर अथवा प्रशासकीय वाद उद्भवल्यास सदर बांधकाम परवानगी रद्द् झाल्याचे समजण्यांत येईल. ✓

२१) स्टिल डिझाईनरच्या नकाशाप्रमाणे / निर्देशाप्रमाणे भुकंप रोधक बांधकाम करणे संबंधितास बंधनकारक राहील. ✓

मुख्याधिकारी
नगर परिषद, अंबड

प्रतिलीपी/-

१) नगर भुमापणे अधिकारी अंबड यांना देउन सुचित करण्यांत येते की, संबंधित सी. टी. एस. क्रमांकामध्ये योग्य ते फेरबदल करावे.

२) स्वच्छता निरिक्षक न. प. अंबड यांना देउन सुचित करण्यांत येते की, बांधकाम मंजुर नकाशा प्रमाणेच होत आहे, किंवा कसे याकडे लक्ष ठेवावे नसता आपल्याला वैयक्तीकरित्या जबाबदार धरण्यात येउन नियमान्वये आपल्याविरुध्द कारवाही करण्यांत यईल.

३) बील कलेक्टर न. प. अंबड यांना माहितीस्तव.

-स्वा-
मुख्याधिकारी
नगर परिषद, अंबड

Scanned by CamScanner